कृषी उन्नती योजना - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (तेलबिया व वृक्षजन्य तेलबिया) अंतर्गत सन २०१८-१९ करिता अनुसूचित जमाती प्रवर्गाचा रु. १५४.०५ लाख निधी वितरीत करणेबाबत

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : रागते-१०१८/प्र.क्र. ७३/४अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१९.

संदर्भ:-

१. केंद्र शासनाचे अभियाना संदर्भात http://agricoop.nic.in/dacdiviion/dacdiviion/NMOOP२०१४.pdf या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या मार्गदर्शक सूचना
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि. ०२/०४/२०१८.
३. कृषी व पदुम विभाग शासन निर्णय क्र.०४१८/प्र. क्र१५५/१४-अे, दि.२७/०४/२०१८.
४. केंद्र शासनाचे पत्र क्र.४-१/२०१८-NFSM(OS &OP),दि.०८ मार्च, २०१८.
५. केंद्र शासनाचे पत्र क्र.४-१/२०१८-NFSM(OS &OP),दि.०२ मे, २०१८.
६. कृषी व पदुम विभाग शासन निर्णय क्र.अेअेपी-२०१८/प्र.क्र.४६/४-अे, दि.१६ मे, २०१८.
७. कृषी व पदुम विभाग शासन निर्णय क्र.अेअेपी-२०१८/प्र.क्र.४६/४-अे, दि.२० जून,२०१८
८. केंद्रीय कृषी मंत्रालयाचे पत्र-२०१७/१-१४-CA-II, दिनांक २८मे.२०१८ ,
९. कृषी व पदुम विभाग शासन निर्णय क्र.रागते-१०१८/प्र.क्र.७३/४-अे, दि.३० जून, २०१८.
१०. केंद्रीय कृषी मंत्रालयाचे पत्र-१४-१/२०१८-CA-II, दिनांक ०५ डिसेंबर, २०१८.
९. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.वि.प्र.२/राअसु(गळीत)१८-१९/वि.मा.दु.हप्ता/प्र.क्र.०६/३५१/१८, दि.१७ डिसेंबर, २०१८.
१०. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.बीयुडी-२०१८/प्र.क्र.११/कार्यासन.६, दि.२० फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना :-

तेलबियांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान [National Mission on Oilseed and Oil Palm (NMOOP)] सन २०१४-१५ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. सदर अभियानाअंतर्गत लघुअभियान-१ (तेलबिया), लघुअभियान-२ (तेलताड) व लघुअभियान-३ (वृक्षआधारित तेलबिया) या तीन लघुअभियानांचा समावेश आहे.तथापि, सद्यस्थितीत लघुअभियान-१ व लघुअभियान-३ या दोनच अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रमाण ६०:४० असे आहे.

केंद्र शासनाने दि.०८/०३/२०१८ च्या पत्रान्वये पूर्वीचे राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियानाचा सन २०१८-१९ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाअंतर्गत लघु अभियान-१ (तेलबिया) व लघु अभियान-३ (वृक्षजन्य तेलबिया) म्हणून समावेश केला आहे. सदर योजनेचा केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा (६०:४०) पूर्वी प्रमाणेच राहील.

केंद्र शासनाने सदर अभियान सन २०१८-१९ या वर्षात राबविण्यासाठी दि.०२ मे, २०१८ च्या पत्रान्वये ₹६९०४.९८ लाख एवढया रकमेच्या कार्यक्रमास मान्यता दिलेली आहे. यामध्ये केंद्र हिस्सा ₹४१७४.९८ लाख व राज्य हिस्सा ₹२७३०.०० लाख एवढया रकमेचा समावेश आहे. सदर कार्यक्रमास दि.१६ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. केंद्र शासनाने सदर अभियान सन २०१८-१९ या वर्षात राबविण्यासाठी दि.११ जून, २०१८ च्या पत्रान्वये गतवर्षीच्या प्रलंबित दायीत्वासह ₹७९००.९१ लाख एवढया रकमेच्या कार्यक्रमास सुधारीत मान्यता दिलेली आहे. यामध्ये केंद्र हिस्सा ₹४८५६.०० लाख व राज्य हिस्सा ₹३०४४.९१ लाख एवढया रकमेचा समावेश आहे. सदर कार्यक्रमास दि.२० जून, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

केंद्र शासनाने संदर्भाधीन अ.क्र.८ येथील पत्रान्वये सदर अभियानातंर्गत अनुसूचित जमातीकरिता केंद्र हिश्श्याच्या पहिल्या हप्त्यापोटी मुक्त केलेल्या रु.९६.५१ लक्ष एवढया रकमेस संदर्भ अ.क्र.९ येथील दि.३० जून, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

केंद्र शासनाने दिनांक ०५ डिसेंबर, २०१८ च्या पत्रान्वये अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता अभियानांतर्गत लघुअभियान-१ (तेलबिया) करीता दुस-या हप्त्यापोटी केंद्र हिस्याचा ₹१३५.०४ लाख निधी वितरीत केलेला आहे व लघुअभियान-३ (वृक्षजन्य तेलबिया) करीता ₹१.५९ लाख असा एकूण रु.१३६.६३ लाख निधी मुक्त केला आहे.

केंद्र शासनाने सदर अभियानातंर्गत दुस-या हप्त्याचा निधी मुक्त करताना मंजूर कार्यक्रमाच्या तुलनेत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रु.३९.६१ लाख व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी रु.४४.२० लाख असा एकूण रु.८३.८१ लाख निधी अतिरिक्त वितरीत केला आहे. त्यानुषंगाने अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी लघुअभियान-१ (तेलबिया) करीता केंद्र हिस्स्याचा रु.९०.९४ लाख निधी व लघुअभियान-३ (वृक्षजन्य तेलबिया) करीता केंद्र हिस्स्याचा रु.१.४९ लाख असा एकूण रु.९२.४३ लाख केंद्र हिस्स्याचा निधी वितरीत करण्याबाबत कृषि संचालक (वि व प्र) यांनी दि.१७ डिसेंबर, २०१८ च्या पत्रान्वये प्रस्तावित केले आहे. सबब, सदर अभियानातंर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी केंद्र हिस्स्याचा रु.९२.४३ लाख निधी व त्या समरुप राज्य हिस्स्याचा रु.६१.६२ लाख असा एकूण रु.१५४.०५ लाख निधी वितरीत करण्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे -

शासन निर्णयः

१. सन १९-२०१८ करीता कृषी उन्नती योजना-राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत **लघुअभियान-१ (तेलबिया) व** अभियान क्र.३ (वृक्षजन्य तेलबिया) करीता सन २०१८-१९ या वर्षात राज्यात राबविण्यासाठी **अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी** केंद्र व राज्य हिस्स्याचा मिळून एकूण **₹१५४.०५ लाख (रुपये एक कोटी चोपन्न लाख पाच हजार फक्त)** निधीच्या वितरणास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधीपैकी केंद्र व राज्य हिस्साच्या निधीचे विवरण पुढीलप्रमाणे-

(रु. लाख)

अ. क्र.	राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- तेलबिया व तेलताड अभियान	अनुसूचित जमाती प्रवर्ग		एकूण
		केंद्र हिस्सा (६०%)	राज्य हिस्सा (४०%) (डी.पी.डी.सी. तून)	
१	अभियान क्र.1 (तेलबिया)	९०.९४	६०.६३	१५१.५७
२	अभियान क्र.३ (वृक्षजन्य तेलबिया)	१.४९	०.९९	२.४८
	एकूण	**९२.४३**	**६१.६२**	**१५४.०५**

२.   परि.क्र.१ नुसार कृषी उन्नती योजना-राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत **लघुअभियान-१ (तेलबिया)** करीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीपैकी केंद्र हिस्याचा **₹९०.९४ लाख निधी (रुपये नव्वद लाख चौ-याण्णव हजार फक्त)** आयुक्त (कृषी) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येत असून सदर निधी खालील लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ करिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा:-

मागणी क्रमांक टी-५
२४०१- पीक संवर्धन
७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना
(१४) कृषि उन्नती योजना-राष्ट्रीय तेलबिया व तेलताड लघु अभियान-१ तेलबिया
(के.पु.यो.) (केंद्र हिस्सा) (६०%) (आक्षेउयो)
(२४०१ A४८६) ३३, अर्थसहाय्य

३.   परि.क्र.१ नुसार कृषी उन्नती योजना-राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान **लघुअभियान-३ (वृक्षजन्य तेलबिया)** करीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीपैकी केंद्र हिस्याचा **₹१.४९ लाख निधी (रु.एक लाख एकोणपन्नास हजार फक्त)** आयुक्त (कृषी) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येत असून सदर निधी खालील लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ करिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा:-

मागणी क्रमांक टी-५
२४०१- पीक संवर्धन
७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना
(०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना
(१६) कृषि उन्नती योजना-राष्ट्रीय तेलबिया व तेलताड लघु अभियान-३)
वृक्ष आधारीत तेलबिया) (के.पु.यो.)
(केंद्र हिस्सा) (६०%) (आक्षेउयो)
(२४०१ A५०१) ३३, अर्थसहाय्य

तसेच कृषी उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत तेलबिया व वृक्षजन्य)तेलबिया (करिता वितरणास मान्यता देण्यात आलेला राज्य हिस्स्याचा **₹ ६१.६२ लाख (रुपये एकसष्ट लाख बासष्ट हजार फक्त)** निधी जिल्हा स्तरावर जिल्हा नियोजन व विकास समितीच्या (DPDC) सन २०१८-१९ करिता अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या तरतुदीतून जिल्हा स्तरावर PFMS प्रणालीद्वारे खर्ची टाकावा.

४.   या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेल्या केंद्र हिस्स्याच्या निधीच्या प्रमाणात आवश्यक राज्य हिस्स्याच्या निधीस जिल्हा नियोजन व विकास समितीच्या (DPDC) अखत्यारीतील तरतूदीस संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून वित्तीय मान्यता देण्यात यावी.

५.   या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत (तेलबिया व वृक्षजन्य तेलबिया) करिता उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य हिस्स्याच्या **₹ १५४.०५ लाख** रक्कमेचे जिल्हा निहाय/ कार्यालय निहाय वाटप करण्याकरिता संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांना प्राधिकृत करण्यात येत असून त्यांनी अभियानांतर्गत जिल्हानिहाय वाटप करावयाचा निधी BDS प्रणालीद्वारे विभागीय कृषि सहसंचालकामार्फत जिल्हयांना वितरीत करावा व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी अदायगी PFMS प्रणालीद्वारे करावी.

६. सदर निधी खर्च करताना संदर्भाधीन अ.क्र.१ येथील अभियानाच्या मार्गदर्शक सूचना अ.क्र.३ येथील दि.२७ एप्रिल, २०१८ च्या शासन निर्णय व संदर्भाधीन अ.क्र.६ येथील दि.१६ मे, २०१८ च्या शासन निर्णयातील अटी, शर्ती व विहित कार्य पध्दतीचे कटाक्षाने पालन करण्यात यावे.

७. हा शासन निर्णय आदिवासी विकास विभागाच्या मान्यतेने व वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि. ०२ एप्रिल, २०१८ नुसार विहीत केलेल्या अटींची पुर्तता होत असल्याने तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२२१७३३१२३७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2019.02.22 17:36:16 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
५. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
८. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे
९. सर्व जिल्हाधिकारी,
१०.सर्व विभागीय कृषि सहसंचालक
११.सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
१२.सर्व कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद
१३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४.सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद
१५.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, शास्त्रीनगर, अकोला.
१६.सह संचालक लेखा व कोषागरे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, पाचवा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई
१७.महालेखापाल (लेखा व अनुज्ञयेता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
१८. महालेखाकार (स्थानीय निकाय लेखापरिक्षा व लेखा), प्रतिष्ठा भवन ,१०१ महषी कर्वे मार्ग, मुंबई-४०० ०२०
१९.नियोजन विभाग (कार्यासन - १४३१ / कार्यासन - १४४४), मंत्रालय, मुंबई - ३२
२०.वित्त विभाग (व्यय-१) /अर्थसंकल्प -१३), मंत्रालय, मुंबई - ३२
२१.निवडनस्ती (कार्यासन-४अे).